# शस्त्रक्रियेद्वारे मधुमेहातून मुक्तता

## रुग्णांना दिलासा : उपचारांसाठी तीन-चार लाखांचा खर्च

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १९ : इन्सुलिनची मात्रा घेऊन किंवा गोळ्या खाऊन कंटाळलेल्या मधुमेहाच्या रुग्णांना शस्त्रक्रिया करून त्यावर कायमची मात करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये एका रुग्णावर नुकतीच अशी शस्त्रक्रिया करण्यात आली. इन्सुलिनशिवाय आपण जगू शकतो, असा आत्मविश्वास या रुग्णामध्ये निर्माण झाला आहे.

मधुमेह हा सुखवस्तू लोकांना विळखणारा आजार असल्याचा सर्वसाधारण समज असला, तरी शस्त्रक्रिया झालेले बलजेंद्र सिंह हे गॅस सिलिंडर पोहोचविण्याचे काम करतात. ४ ऑक्टोबर रोजी त्यांच्यावर शस्त्रक्रिया झाली.

### मधुमेह अपडेट



- जगभरात १७१ कोटी लोक मधुमेहग्रस्त.
- २०३० पर्यंत ही संख्या दुप्पट होण्याची शक्यता.
- तीन कोटी भारतीय मधुमेहाने ग्रस्त.
- दहा वर्षांत ही संख्या सात कोटींवर जाण्याची शक्यता.
- 'मधुमेहाची राजधानी' म्हणून भारताकडे पाहिले जाते.
- औषध कंपन्यांसाठी भारत ही मोठी बाजारपेठ.
- मधुमेहामुळे हृदयविकार, किडनी, पॅरालिसिस, अंधत्वाची शक्यता.

त्यानंतर त्यांच्या रक्तातील शुगर २३५ वरून आता १०० ते १४० पर्यंत खाली आली आहे. "मधुमेहाचे निदान झाल्यानंतर आतापर्यंत औषध-गोळ्यांवर दर महिन्याला दोन हजार रुपये याप्रमाणे ६० हजार रुपये खर्च झाले; तरीही शुगर आणि रक्तदाब नियंत्रित होत नसल्याने मला काम करणे अवघड झाले होते," असे बलजेंद्र सिंह यांनी सांगितले.

'अ युनिक आयलियल इन्टरपोझिशन सर्जरी' नावाची ही जठराशी संबंधित शस्त्रक्रिया प्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. रमण गोयल यांनी केली. जठराला लहान आतडे आतील बाजूने जोडण्याची ही शस्त्रक्रिया भारतात फारशी केली जात नाही.

मुळातच शस्त्रक्रियेने मधुमेह आटोक्यात येऊ शकतो, याची जागृती अजून आपल्याकडे पुरेशी झालेली नाही. त्यामुळेच या शस्त्रक्रियेला वेगळे महत्त्व असल्याचे डॉ. गोयल यांनी नमूद केले. तीन ते चार लाखांचा खर्च येतो; शस्त्रक्रिया हा पहिला आणि शेवटचा उपचार असल्याने त्यानंतर रुग्ण मधुमेहासारख्या आजारातून मुक्त होतो. शस्त्रक्रिया हा चांगला पर्याय असल्याचा दावाही त्यांनी या वेळी केला.